ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतातील सांप्रदायिकवादाच्या विकासामध्ये ब्रिटिश प्राचार्य थियोडोर बेकने अलीगड चळवळीला दिलेले जातीयवादी स्वरुप एक अभ्यास

**प्रा डॉ. संतोष शंकरराव इंगोले**
**श्री तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय वाशीम.**

***प्रस्तावना :***



इ.स.1886 ते इ.स. 1906 हा कालखंड भारताच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक बदलांच्या भूमिकेतून अतिशय महत्वाचा मानल्या जातो. याच कालखंडामध्ये भारतात खऱ्या अर्थाने जातीय राजकारणाचा उदय झाला. ब्रिटिशांनी भारतात राबविलेल्या शैक्षणिक धोरणामुळे भारतीय समाजामध्ये सुशिक्षीतांचा एक वर्ग निर्माण झाला. या सुशिक्षीत वर्गाने पाश्चात्यांच्या जीवन मूल्यांचे, राजकीय विचारांचे वाचन केले. या विचारांच्या प्रभावातूनच भारतीय जनतेमध्ये ब्रिटिशांच्या अन्यायी धोरणाविरूध्द ओरड सुरू झाली. या स्थीतीमधून भारतामध्ये राष्ट्रवादी विचारांचा भरलेला सुशिक्षीतांचा एक वर्ग निर्माण झाला. या नवविचारांच्या भारतीयांनी आपल्या हक्कांची मागणी करण्यासाठी व्यासपीठ म्हणुन भारतीय काँग्रेसची इ.स.1885 मध्ये स्थापना केली.

काँग्रेसच्या माध्यमातून भारतीयांच्या मागण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत गेले. त्यामुळे सुरवातीला काँग्रेसविषयी असलेल्या शासनाच्या सहकार्याच्या भूमिकेत परिवर्तन घडून आले. तसेच इ.स.1892 च्या कायद्याने भारतीयांच्या आकांक्षा पूर्ण झाल्या नाहीत. लोककल्याणाकडे शासनाने पाठ फिरविल्याने राष्ट्रवादी चळवळीमध्ये जहाल विचारांचा उदय झाला. अल्पसंख्यांकांच्या मागण्यांकडे विशेष लक्ष देवून बहुसंख्याकांवर अन्याय करण्याच्या धोरणाचा अवलंब करण्यात आला. त्याद्वारे भारतीय राष्ट्रवादाला कमकुवत करण्यासाठी भारतातील वेगवेगळया संप्रदायांच्या समूहाला वेगवेगळया माध्यमाने प्रसन्न करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांचा भारतातील धोरणाचा मोठा आधार झाला.

या धोरणानुसार नोकरी, राजकीय प्रतिनिधीत्व, प्रादेशिक वर्चस्व या माध्यमातून विशिष्ट गटाला खुश करून ब्रिटिश धार्जीने आणि राष्ट्रवाद विरोधी बनविण्यात आले. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय चळवळीवर मात करणे ब्रिटिशांना शक्य झाले. यामधून भारतामध्ये कधी नव्हे एवढा जातीय व धार्मिक आधारावर राजकीयवादाचे बिजारोपण झाले.

भारतातील मुस्लीमांनी आधुनिक शिक्षणाचा स्वीकार करावा या मताचा पुरस्कार करणारे "सर सय्यद अहमद खान यांनी इ.स.1875 मध्ये अलीगड येथे मुहॅामेडन अँग्लो-ओरियंटल स्कूल ची स्थापना केली. पुढे या संस्थेचे रूपांतर इ.स.1878 मध्ये महाविद्यालयात केले."[1] मुसलमान इंग्रजी शिक्षणापासून वंचित राहिले, तर राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात हिंदुपेक्षा मागे राहतील. इंग्रजी शिक्षणात इस्लाम विरोधी काही नाही. त्यामुळे मुस्लीमांनी बुध्दीवादी दृष्टिकोन आत्मसात करावा याकरिता अलीगड येथे महाविद्यालयाची स्थापना झालेली होती. परंतु पुढील काळात या संस्थेचा मोठा वर्ग ब्रिटिश असल्याने या संस्थेला ब्रिटिश कारस्थानाचे ठिकाण असे स्वरूप प्राप्त झाले. आणि येथूनच मुस्लीमांना राष्ट्रवादी चळवळीपासुन दूर ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न ब्रिटिश कर्मचारी वर्गाने केला. त्यामध्ये ते मोठया प्रमाणात यशस्वी झालेत.

अलीगड महाविद्यालयामध्ये प्राचार्य म्हणुन नियुक्त झालेल्या ब्रिटिशांनी भारतामध्ये सांप्रदायिक वाद निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच ब्रिटिशांविरूध्द निर्माण झालेली राष्ट्रवादाची भावना कमजोर करण्यासाठी मूस्लीमांच्या वेगळेपणाचा प्रश्न उपस्थित केला. त्यामुळे मुस्लीमांनी आपले आर्थिक आणि राजकीय हितसंबंध जोपासण्यासाठी ब्रिटिशांना सतत पाठींबा दिला. यादृष्टीने मुहॅामेडन ॲंग्लो ओरियंटल महाविद्यालयाच्या पहिला प्राचार्य थियोडोर बेक याचे योगदान मोठे होते.

**भारतातील सांप्रदायिकवादाच्या विकासामध्ये ब्रिटिश प्राचार्य थियोडोर बेकचे योगदान :-**

थियोडोर बेक या प्राचार्याचे भारतात जातीयवाद वाढविण्यात महत्वाचे योगदान होते. ''इ.स.1884 मध्ये मुहॅामेडन ॲंग्लोओरिएंटल कॉलेजचा पहिला प्राचार्य म्हणून नियुक्त झालेल्या थियोडोर बेकचा जन्म इ.स.1859 मध्ये लंडन येथे झाला.''[2] महाविद्यालयीन शिक्षण केंब्रीज विद्यापीठमध्ये पूर्ण केल्यानंतर सय्यद मोहम्मद या मित्राने दिलेल्या माहितीने वयाच्या 24 व्या वर्षी रोजी अलीगड महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून काम करण्याची जबाबदारी 28 जानेवारी 1884 स्विकारली. भारतामध्ये येण्यापूर्वी बेक यांची भारतविषयक भूमिका निश्‍चित झालेली होती. भारतामध्ये ब्रिटिशांचे साम्राज्य मजबूत करण्याचा त्याचा प्रयत्न होता. त्यासाठी त्याने भारतात अल्पसंख्यांकाच्या मताचा प्रश्न उभा केला. याविषयी इ.स.1883 मध्ये भारतात येण्यापूर्वी इंग्लड येथे केलेल्या भाषणात त्यांनी म्हटले की, ''संसदीय शासन पध्दती हिन्दुस्थानला मुळीच मानवणारी नाही. आणि प्रातिनिधिक संस्था दाखल केल्या तर तो प्रयोग फसेल. मुसलमानांना हिंदुच्या बहुमताखाली राहावे लागेल, आणि ही गोष्ट मुसलमानांना कधीच आवडणार नाही. माझी खात्री आहे की ,ते शांतपणे कधीच मान्य करणार नाहीत.''[3] अशारीतीने मुस्लीमांच्या मतानुसार शासन प्रणाली निर्माण करण्याइतके महत्व त्याने मुस्लीम गटाला दिले. त्यांच्या या मताचा प्रभाव भारतातील मुस्लीम पुढाऱ्यांवर झाला. त्यांनी आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याकरिता ब्रिटिशांचा मदतीचा आधार घेवून लोकशाही शासनाचा विरोध केला. याविषयी सर सय्यद अहमद यांनी व्यक्त केलेली भावना म्हणजे, ''निवडणुकीवर अधिष्ठीत असलेली प्रतिनिधीक पध्दती म्हणजे बहुसंख्य असलेल्या लोकांच्या हितसंबंधाचे आणि मताचे प्रतिनिधीत्व करणे होय.''[4] अशाप्रकारे लोकशाहीला विरोध करून अधिक लाभ पदरात पाडून घेण्याच्या धोरणाचा मुस्लीमांनीही स्विकार केला.

अशा परीस्थितीत भारतात राष्ट्रवादाची भावना वेगाने पसरत होती. त्याला आळा घालण्यासाठी बेकने आपली भूमिका निश्‍चित केली. त्यासाठी ''निर्माण झालेल्या राष्ट्रवादाला प्रतिबंध घालण्यासाठी संरक्षण पंखाच्या धोरणानुसार मुस्लीमांचा उपयोग करण्याचे मिशनऱ्यांचे धोरण बेकने पुढेही सुरू ठेवले.''[5] भारतातील हिंदु-मुस्लीम नववधुचे सुंदर डोळे आहे, असे म्हणणाऱ्या सर सय्यद अहमदखॉंने भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना होताच तिला विरोध केला. आणि त्यांना तसे करण्यासाठी थियोडोर बेकने ही प्रयत्न केले. ''त्यामुळे सर सय्यद अहमदची कॉंग्रेस सोबत वादविवादामध्ये आपली भूमिका मांडतांना बेकची मदत मोठया प्रमाणात झाली होती.''[6] तसेच सद सय्यद अहमद यांना कॉंग्रेस चळवळीपासुन दुर ठेवून कॉंग्रेसचे खच्चीकरण करण्यासाठी बेक यांनी विशेष प्रयत्न केले. व मुस्लीमांना सवलतीचे आमीष दाखवीले. त्यामुळे ''सर सय्यद अहमद यांना भारतीय राष्ट्रवादापासून दूर करण्यात आणि मुस्लीम व सरकार यांच्यात जवळीक निर्माण करण्यात थियोडोर प्रामाणिकपणे यशस्वी झाला.''[7]

त्यामुळे मुस्लीमांच्या हिताचे रक्षण करायचे असेल तर ब्रिटिशांना पाठिंबा देणे आवश्यक आहे, असे सर सय्यद अहमद यांना वाटत होते. याच बाबीचा लाभ ब्रिटिशांनी घेतला, त्यामुळे सुरूवातीला संरक्षक पटल वाटणाऱ्या कॉंग्रेसने जेव्हा राष्ट्रीय स्वरूप प्राप्त केले. तेव्हा ज्या मुसलमांनाना राजकीय संघटनापासून दूर ठेवण्यात आले. तेच मुसलमान त्यामध्ये सहभागी झाल्याने कॉंग्रसची शक्ती वाढली. त्यामधुन सत्ता समतोलपणाचा धोका भारतात ब्रिटिशांच्या राजवटीला निर्माण झाला. त्यामुळे ऑगष्ट 1888 मध्ये थियोडोर बेकच्या मदतीने सर सय्यद अहमद यांनी 'युनायटेड इंडियन पेट्रीऑटिक असोशिएशन' नावाची संघटना स्थापण केली. यावेळी आपले चरित्रकार कर्नल ग्रॅहम यांना बेक यांनी कॉंग्रेस विषयी स्विकारलेल्या धोरणाबाबत सांगितले की, ''मी तथाकथीत राष्ट्रीय कॉंग्रेस विरूध्द फार मोठे कार्य अंगीकारले आहे. आणि त्यासाठी एक संघटना बनविली आहे.''[8]

कॉंग्रेस राष्ट्रीय संघटना नसुन मुठभर हिंदुची संघटना आहे. या संघटनेच्या विरोधात भारतातील मुसलमान आणि काही हिंदू संघटना सुध्दा आहेत, हे दाखविण्यासाठी बेक सतत प्रयत्न करीत होता. त्याप्रमाणे ब्रिटिशांची भारतातील सत्ता बळकट करून शासनाविषयीचा असंतोष दुर करणे यासाठी थियोडोर बेकचा प्रयत्न होता. हे 'युनायटेड इंडियन पेट्रीऑटिक असोशिएशन' च्या उदिष्टावरून लक्षात येते. या संस्थेच्या उद्दिष्टामध्ये ''कॉंग्रेस सर्व भारतीयांचे प्रतिनिधीत्व करणारी संघटना आहे हे मत खोडून काढणे, मुसलमान व हिंदू संघटना कॉंग्रेसच्या विरूध्द आहेत हे पटवून देणे, तसेच हिन्दी लोकांच्या मनातील ब्रिटिशविषयक असंतोष नष्ट करणे.''[9] यांचा समावेश होता. हे सर्व दाखविण्यासाठी त्याने मुस्लीमांच्या सहकार्याचा आधार घेण्यात आला.

या संघटनेला मोठे करण्यात बेकने आपली शक्ती खर्च केली. तसेच मुस्लीमांचा सर्वच स्तरातून कॉंग्रेसला विरोध असावा यासाठी सर सय्यद यांच्या वतीने पत्र व्यवहार करून इतरही प्रातांत 'युनायटेड इंडियन पेट्रीयाटिक असोशिएशन' संघटनेच्या शाखा उघडण्यास सुरूवात केली.

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वाढत्या प्रभावाने प्रभावित होवून मुस्लीम कॉंग्रेसपासून दूर राहिले पाहिजे, यासाठी मुस्लीमांना वेळप्रसंगी धमकीवजा इशारा देण्यासही बेकने मागे पाहिले नाही. याविषयी बेक म्हणतो की, ''कॉंग्रेसच्या कारवायामुळे बंडाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचे दुष्परीणाम मुस्लीमांना अधिक भोवतील, क्रूरपणा सारखाच असेल. कॉंग्रेसच्या राष्ट्रवादी भूमिकेने ब्रिटिश लोक सर्व विसरून सुडबुध्दीने वागेल, त्यामध्ये मुसलमान विनाकारण नाश पावतील. मुसलमान पुढारी आपल्या लोकांना कॉंग्रेसपासून दूर

ठेवतात त्याचे एक कारण हे आहे.''[10] अशाप्रकारे मुस्लीमांनी काँग्रेसपासून दूर राहावे यासाठी बेकने साम, दाम, दंड, भेद या साधनाचा उपयोग केला.

मुस्लीमांना काँग्रेसपासून दूर ठेवण्यासाठी बेकने म्हटले की, ''म्युनिसीपालीटीच्या तथाकथीत स्वराज्यात, मुसलमानांवर राज्य करण्यासाठी त्यांना त्याचे हातपाय बांधून त्यांच्या प्रतिस्पर्धाच्या स्वाधीन करण्यात येईल. आणि दूसरे म्हणजे सर्व दुय्यम नेमणुका स्पर्धेच्या परिक्षेनूसार केल्या जातील, त्यामुळे इंग्रजी शिक्षण पुरेसे नसलेल्या किमान एका पिढीच्या मुस्लीमांचे बहुतेक नुकसान होईल.''[11] तसेच मुस्लीम पुढाऱ्यांची काँग्रेसविरोधी राजकारणाविषयी भूमिका तयार करण्यासाठी ब्रिटिशांनी प्रयत्न केले. याविषयी कबुली देतांना एका मुस्लीम मौलवी तुफेल अहमद मलबारी यांनी म्हटले की, ''सर सय्यद अहमद यांना काँग्रेसबद्दल, राजकारणाबद्दल व स्पर्धेच्या परिक्षाकडे पाहण्याची मुसलमानांची वृत्ती काय असावी याबद्दल मते बनविण्यात बेकने मदत केली.''[12] भारतातील राष्ट्रवादी चळवळीला सुरूवात बंगाल प्रांतामधुन झाली. कारण बंगाली लोकांमध्ये आधुनिक शिक्षणाचे प्रमाण मोठया प्रमाणात होते. त्यामुळे बंगाली लोकांचे नोकऱ्यातील प्रमाण कमी व्हावे यासाठी बंगाली चळवळीचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न बेकने केला. सनदी नोकऱ्यांची परीक्षा भारत आणि इंग्लड येथे एकाच वेळी घ्यावी अशी मागणी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी अलीगड विद्यापीठ येथे केलेल्या भाषणात केली. यावर बेकनी मुस्लीम विद्यार्थ्यांना म्हटले की, ''जर सनदी नोकरीची परीक्षा हिन्दुस्थान व इंग्लड येथे एकाच वेळी घेतली, तर त्यामध्ये बंगाली लोकच पास होतील, आणि ते उत्तर हिन्दुस्थानातील दणकट राजपूत व पठाणावर सत्ता गाजवतील.''[13] त्याप्रमाणे ''अलीगड संस्थेचे गॅझेटचे संपादक पद घेतल्यानंतर बेक यांनी संपादकीय लेखामध्ये बंगाली आणि बंगाली चळवळ यांना शिव्या देण्याचे काम सुरू केले. त्याने असे नसते केले, तर अलीगड व राष्ट्रीय चळवळ यांच्यात एवढे कटुतेचे संबंध निर्माण झाले नसते.''[14] अशारितीने त्याने आपल्या लिखानाचा उपयोग भारतातील सांप्रदायिकवाद वाढविण्यासाठी केला.

मुस्लीम पूर्णपणे ब्रिटिशांच्या बाजूचे झाले पाहीजे. यासाठी त्यांच्या मनात लोकशाही पध्दतीची भीती निर्माण करण्याचे काम ब्रिटिशांनी केले. त्यामुळे मूस्लीमांनी भारतात होणाऱ्या लोकसत्ताक पध्दतीचा विरोध केला. लोकसत्ताक पध्दतीचा अंशतः समावेश असलेले बिल चार्लस ब्रॅडलॉ याने इ.स. 1889 मध्ये पार्लमेंट समोर मांडले. यावेळी मुस्लीमांच्या हितसंबंधाची जपवनूक करण्यासाठी बेकने त्याला विरोध केला. याला विरोध म्हणून बेकनी ''या विधेयकाला मुसलमांनाना विरोध करण्याचे शिकविले, एवढेच नाही. तर मुसलमानांच्या या विधेयकाविरोधात आपल्या विद्यार्थ्यांना गावोगावी पाठवून 20735 मुसलमंनाच्या सह्या घेवून ते निवेदन ब्रिटिश सरकारला सादर केले.''[15]

मुस्लीमांच्या हक्काची मागणी करण्यासाठी फक्त मुस्लीम संस्थेची गरज आहे, असे बेक यांनी म्हटले. यावेळी भारतात फक्त 'पेट्रीऑटिक असोशिएशन' निर्जातीय संघटना आहे. अशावेळी हिन्दुस्थानात दोन चळवळी उदयास आलेल्या. आहेत एक म्हणजे राष्ट्रीय व दुसरी गोवधबंदी, एक ब्रिटिश विरूध्द आहे, तर दुसरी मुस्लीम विरोधी आहे. या चळवळीचा उद्देश भारताचे शासन ब्रिटिशांच्या ताब्यातून घेवून हिंदुच्या विशिष्ट वर्गाच्या हातात देणे हा आहे. तेव्हा हिंदुच्या चळवळीला आणि राष्ट्रीय लोकसत्ताक सरकारला विरोध करण्यासाठी ब्रिटिश व मुस्लीम युती होणे आवश्यक आहे. या ''भुमिकेतून डिसेंबर 1893 मध्ये बेकने सर सय्यद अहमद यांच्या मदतीने 'मुहॉमेडन ॲग्लो ओरिएंटल डिफेन्स असोशिएशन ऑफ अपर इंडिया' ची स्थापणा केली.''[16] या संघटनेच्या उद्दिष्टामध्ये ब्रिटिशांचे भारतातील धोरण स्पष्ट होते.

त्यामध्ये मुसलमानांच्या राजकीय हक्काचे रक्षण करणे, ब्रिटिश सत्ता बळकट करण्यासाठी मुस्लीमांचा उपयोग करणे, राजकीय चळवळ मुसलमानात पसरण्यास प्रतिबंध करणे आणि सरकार विषयी मुसलमानमध्ये निष्ठा निर्माण करणे हे होते. या असोशिएनच्या लंडन शाखेच्या 1895 च्या वार्षीक अधिवेशनामध्ये भारतातील सांप्रदायिक वाद वाढविणारे विचार बेक यांनी व्यक्त केले. त्यामध्ये बेकने म्हटले की, ''ब्रिटिश व मुसलमान यांची मैत्री शक्य आहे. परंतु मुसलमान व शिवाजीचे, गुरू गोविंदसिंगचे अनुयायी हे कधीच एक होणार नाहीत. जे सरकार बहुसंख्याकांचे मुसलमानावर राज्य करतील ते मुसलमान कधीच मान्य करणार नाही.''[17] अशारितीने मुस्लीमांचा वेगळा गट आहे, हे दाखविण्यासाठी ब्रिटिशांकडून वेळोवेळी प्रयत्न होता.

वरील विचेनावरून असे म्हणता येते की, अलीगड कॉलेजचे प्राचार्य सुध्दा भारतामध्ये ब्रिटिशांचे शासन मजबूत करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यासाठी भारतामध्ये असलेल्या धार्मिक आणि जातीय भेदाचा उपयोग त्यांनी केला. मुस्लीमांना अल्पसंख्य समजून त्यांच्यामध्ये हिंदुची सतत भिती निर्माण केली. त्यामुळे भारतात लोकशाही पध्दतीचा विकास होण्यास अडथळे निर्माण झाले. याचा फायदा ब्रिटिशांना झाला. त्याच बरोबर काँग्रेसच्या धोरणाने देशात अशांतता निर्माण झाली आहे, असा देखावा निर्माण केला. त्यामुळे ब्रिटिश शासन काँग्रेस विरूध्द शस्त्र हाती घेतील. त्यामध्ये मुसलमानांची हानी होईल या कारणाने मुस्लीमांनी काँग्रेसपासून दूर राहून आपल्या हितसंबंधाची जपवणूक ब्रिटिशांच्या मदतीनेच करावी असा इशाराही दिला. त्यामुळे राष्ट्रीय चळवळ व मुस्लीम यांच्यामध्ये रूंदावत जाणारी दरी वाढली. या परस्परविरोधी भुमिकेतून निर्माण झालेल्या राजकीय समस्यांचे समाधान भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी होणे अशक्य झाले.

## संदर्भ सूची :-

1) Majumdar, R.C., 'An advanced hostory of India', Macmillan Asian Historical Series Publication, Fourth Education. 1967 P.885.
2) https://en.m.Wikipedia.org.wiki.Theodor beck
3) Nomad Mohammad, 'Muslim India' Allahabad Kitabistan, Publication, First adition. 1942 P.52.
4) Ibid -P.34
5) Prasad Rajendra, 'India Divided', 'Hind Kitab publication Bombay, First edition, 1946, P.94-95.
6) Zakaria Rafiq, 'Rise off muslim in India politics' Somaliya publication Bombay, First edition, 1970, P. 57.
7) Prasad Rajendra, P.95.
8) Gopa Ram, 'Indian Muslims A political History 1858-1947', Asia Publication house New York 1959, P.67.
9) Ibid, P.68
10) Ibid,.P.68
11) Ibid, P.68-69
12) Ibid,P.69
13) Ibid,P.70
14) Ibid,P.70-71
15) Prasad Rajendra, op.cit, P.99.
16) Tarachand., 'History of the freedom moment in India', Division Ministry of Information Delhi 1947, 02Volume, Second Print, P.376.
17) Gopal Ram, Op.cit, P.72.